रयत शिक्षण संस्थेचे

# सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

(अधिकार प्रदत्त स्वायत्त)

**ज्युनिअर शाळासिध्दी मानांकन : A+ (९९.२७% गुण)**




# माहिती पत्रक

## ज्युनिअर कॉलेज आणि व्यवसाय शिक्षण



बापहोऽऽ आपल्या मुलाले शिक्षण द्या!
पैसे नाही म्हणाल तर जेवणाचे ताट मोडा
हातावर भाकरी खा
बायकोले लुगडं कमी भावाचे घ्या
पण मुलाले शाळेत घातल्या विना राहू नकाऽऽ
संत गाडगे बाबा

संत गाडगे बाबा
(कै.डेबूजी झिंगराजी जाणोरकर)
जन्म : २३ फेब्रुवारी १८७६
महानिर्वाण : २० डिसेंबर १९५६

## VISION AND MISSION

**Vision :**

Quality education to all, especially the rural, Semi-rural and socio economically deprived students to make them self-reliant.

**Mission :**

- To impart quality education to the young generation of India keeping pace with regional, national and international educational scenario in order to make it locally and globally competent.
- To provide education to all the classes of society, especially to the downtrodden, economically and socially backward sections of society to make them self confident and self reliant.
- To impart value-based education, emboding socio-cultural,scientific commercial and physical training in order to achieve all round development of the student's personality.
- To sharpen student's sensibilities with enlightened secular democratic and human values for encouraging their participation in corporate life.
- To promote among the students a sense of equality national integration, social justice and to act as a catalyst in socio - economic transformation for national development.
- To impart need based, time relevant and innovative programmes promoting the use of latest technology.

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"

कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड

## (अधिकार प्रदत्त स्वायत्त)

**विद्यानगर, कराड** पिन – ४१५ १२४ जि. सातारा (महाराष्ट्र) पो. ऑ. बॉ. नं. ३
**फोन :** कार्यालय : (०२१६४) २७१३४६ **फॅक्स :** (०२१६४) २७१३४६
**Website :** www.sgm.edu.in **E-mail :** sgmkarad@yahoo.com



संस्थापक

**पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील**

## विश्वस्त मंडळ

**माननीय डॉ. शरदरावजी पवार**
अध्यक्ष
रयत शिक्षण संस्था, सातारा

**ॲड. रविंद्र पवार**
चेअरमन
स.गा.म. कॉलेज विकास समिती

**मा. विकास देशमुख**
सेक्रेटरी
रयत शिक्षण संस्था, सातारा

**मा. चंद्रकांत दळवी**
चेअरमन
रयत शिक्षण संस्था, सातारा

# ABOUT THE RAYAT SHIKSHAN SANSHTA

Late Padmabhushan Dr. Karmaveer Bhaurao Patil alias Anna established the Rayat Shikshan Sanstha at Kale, Tal. Karad, Dist. Satara on 4th October 1919 for imparting education to all and sundry, with the promise of self-help, self-culture, self-knowledge irrespective of caste, creed, colour or community. It is this secular aspect of the institution that is derived from the Father of the Nation who christened the first Boarding at Satara as the "Chhatrapati Shahu Boarding" in 1927. The Rayat Shikshan Sanstha is not only the institution of academic excellence but also a laboratory of social transformation. Karmaveer Anna believed in the principle that education is an instrument of social change. He started more than 500 voluntary schools all over Maharashtra without any financial aid from the Government. The ' Dignity of Labour' is the supreme value practised in the institution through its motto 'Education through self-help'. The emblem of the Sanstha is the Banyan tree having several branches. Sanstha has completed 100 years of its establishment. Now a days, the sanstha runs 36 Pre-Primary Schools, 51 Primary Schools, 438 Secondary Schools, 42 Colleges, 7 Training College, 90 Hostels, 8 Ashram Shalas, 6 Industrial Training Institutes, 5 Regional offices and 59 other branches having 4,52,868 students and 12,965 employees. Six colleges of sanstha have got the Autonomous status. 11 colleges were accredited 'A++' grade, 6 colleges were accredited 'A+' grade and 6 were accredited with 'A' grade by NAAC. Sanstha has made no. of MOUs with national & international institutes for quality education. Karmaveer Bhaurao Patil Cluster University is established by Govt. of Maharashtra on 27th Oct. 2021

खेडोपाड्यातल्या सर्व मुलांना शिक्षण मिळावे म्हणून पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी काले, ता. कराड जि. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना ४ ऑक्टोबर १९१९ ला केली. संस्थेस १०० वर्षे पूर्ण झाली असून या संस्थेत सर्व स्थरातील व सर्व जाती धर्मातील मुलांना शिक्षण दिले जाते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी गौरवलेले सर्व जाती धर्मातील मुलांचे वसतिगृह 'छत्रपती शाहू बोर्डिंग'१९२७ साली सुरू झाले. या संस्थेत अभ्यासक्रमाबरोबरच सामाजिक सहिष्णूतेचे शिक्षण दिले जाते. कर्मवीर आण्णांच्या मते सामाजिक बदलाची सुरूवात शिक्षणामुळे होते. 'श्रमाला महत्व' या न्यायाने त्यांनी संस्थेचे बोध वाक्य 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' असे ठेवले. संस्थेचे बोधचिन्ह 'वटवृक्ष' असून त्यांच्या पारंब्याप्रमाणे संस्थेच्या शाखा सर्व महाराष्ट्रभर पसरलेल्या आहेत. संस्थेच्या ३६ पूर्व प्राथमिक शाळा, ५१ प्राथमिक शाळा, ४३८ माध्यमिक शाळा, ४२ महाविद्यालये, ७ ट्रेनिंग शाळा, ९० वसतिगृहे, ८ आश्रमशाळा, ६ इंडस्ट्रीयल ट्रेनिंग इन्स्टीट्यूट, ५ विभागीय कार्यालये आणि ५९ इतर शाखा कार्यरत आहेत. संस्थेमध्ये ४,५२,८६८ विद्यार्थी व १२९६५ शिक्षक/सेवक काम करत आहेत. संस्थेच्या पाच महाविद्यालयांना यु.जी.सी. ने स्वायत्ततेचा दर्जा बहाल केला आहे. ११ कॉलेजस्ना 'A++'ग्रेड, ६ कॉलेजस्ना नॅकची 'A+' व ६ कॉलेजस्ना नॅकची 'A' ग्रेड मिळाली आहे. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी संस्थेने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध संस्थांशी सहकार्य करार केले आहेत. २७ ऑक्टोबर २०२१ रोजी महाराष्ट्र शासनाने कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाची स्थापना केली आहे.

## 03. FROM THE PRINCIPAL'S DESK



**Prin. Dr. M. M. Rajmane** M.Sc., Ph.D.

It gives me immense pleasure to welcome all the aspirants to the Rayat Shikshan Sanstha's S.G.M. College, Karad for the new academic year.

The mission of the college is to impart value based quality education to young generation of India. The college runs different academic programmes. The slogan of the college is **'Be and Bear, Do and Dare'**. The college provides facilities for the education of the poor and needy students through 'Earn and Learn' scheme. It is seen that no one is deprived of education on account of poverty. Our complete focus is to shape our students in such a way that they can hold an elegant position in their personal and social life. The students must be equipped with the skills required to face the challenges in future as John Dewey said, **"Education is not preparation of life but education is life itself."**

The college has grown in terms of student strength, courses, extra curricular activities, supporting facilities etc. The college was awarded **'A+'** grade (CGPA 3.63) by NAAC in the third cycle of accreditation. The college has been conferred an Empowered Autonomous status from June 2024 by UGC. Under autonomy some changes were made in the existing syllabi which are in tune with local, industrial and social needs.

We want that our students should become multi dimensional rather than unidimensional. Our Management, Teaching & Non-Teaching staff remember that, **"Success comes to those who work hard and stays with those who don't rest on the laurels of the past".**

My best wishes to all students of the college.

## ABOUT THE COLLEGE

Established in June 1954, Sadguru Gadge Maharaj College, Karad, an affiliate of Shivaji University, Kolhapur, is a multi-faculty premier institute of higher education, having more than 12,000 students on its rolls. The college campus is spread over 17 acres of area in Vidyanagar, Karad. The late Karmaveer Bhaurao Patil started this college by the confluence of the Krishna and the Koyana rivers. The college is recognised by the University Grants Commission under Section 2F and 12 (B) of U.G.C. Act and Accredited "**A+**" with CGPA 3.63 by NAAC, Bangalore. Besides, it is an ISO 9001 : 2015 Certified college. From June 2024 gets Empowered Autonomous status by UGC. Although college is Empowered Autonomous, the degree is awarded by the Shivaji University, Kolhapur. The college offers undergraduate & Post-graduate courses in disciplines of Arts, Commerce & Science. The college also offers professional, vocational diploma courses. There is also provision of a research degree i.e. Ph.D. Our college has a study centre of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik. It is a renowned centre of various society - oriented activities. Special efforts are being made for the enrichment of 'Student - Teacher Research Cell', 'Gender Sensitization' and 'Women Empowerment.'

The college has a vibrant culture and a holistic approach to education. The simultaneous development of the intellectual, physical, cultural and emotional faculties of the students is achieved through various academic, co-curricular and extra-curricular activities such as Sports, NCC, NSS, and Art Circle. The college has been named after Gadge Maharaj, the sensitive, activist, philosopher and justice loving saint of Maharashtra.

This college has flourished under the able leadership of three former Vice Chancellors : Prin. Barr. P. G. Patil, Prin. R. K. Kanbarkar and Prin. Dr. V. K. Ghate, along with the Ex. Chairman of Maharashtra Public Service Commission, Prin. Mrs. S. P. Patil, the eminent educationist, Prin. A. B. Magdum and many other academicians. At present, Prin. Dr. Mohan Rajmane is shouldering the responsibility as the head of the institution.

कृष्णा कोयनेच्या संगमावर या सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेजची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९५४ साली केली हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेशी संलग्न आहे. या महाविद्यालयात १३,००० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या कॉलेजला नॅकचे "A+" with CGPA 3.63 मानांकन प्राप्त झाले असून ISO 9001 : 2015 प्रमाणित कॉलेज आहे. सन २०१९ पासून महाविद्यालय अधिकार प्रदत्त स्वायत्त झाले आहे.

ह्या कॉलेजमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान विभाग पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिकवले जातात. कॉलेजमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे केंद्र कार्यन्वित आहे. कॉलेजमध्ये समृध्द असे ग्रंथालय, अभ्यासिका, प्रशस्त प्रयोगशाळा, इंटरनेट सेंटर, मुला-मुलींसाठी वसतिगृहे आहेत. कॉलेजमध्ये NSS, NCC, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र आहे. हॉटेल मॅनेजमेंट, ब्युटीपार्लर यासारखे व्यवसायाभिमुख अनेक कोर्सेस कॉलेजमध्ये चालवले जातात. 'कमवा व शिका' या योजनेतून गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

पदवी कोर्स सोबतच व्यवसायभिमुख कोर्स विद्यार्थ्यांना करता येणार आहे. हा व्यवसायभिमुख कोर्स तीन स्तरावरती (सर्टिफिकेट, डिप्लोमा, ॲडव्हान्स डिप्लोमा) पूर्ण करता येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार सक्षम होण्यास मदत होईल.

## COLLEGE HIGHLIGHTS

- Affiliated to Shivaji University, Kolhapur
- Accredited **'A+'** grade with CGPA 3.63 by NAAC
- Conferred upon Empowered Autonomous Status for academic flexibility from June 2024
- No. of UG, PG, B.Voc. and other Professional and Skill Development Courses
- Dedicated teaching and non-teaching staff. Well equipped laboratories and research center
- Excellent Infrastructure, Beautiful Campus
- Spacious ICT based Classrooms
- Dr. N. D. Patil Auditorium Hall, Seminar Hall, Media Center for Conference, Guest Lectures and other academic activities
- Competitive Examination Guidance Center
- 'Keshavrao Pawar' Central Library
- Excellent Play ground & 'Abhijeet Kadam  Sports Complex'
- Hostels for Boys' and Girls
- Canteen Facility
- Efficient NCC and NSS units (for boys and girls)
- Hostel for International Students
- Lecture Capturing Room
- Share Market Lab
- IBPS Centre

- Other support services - Health Center, Computer Lab, Language Lab, Nature Club, Botanical Garden, Common Facility Center, Study Rooms, Parking etc.
- Earn and Learn Scheme
- Student Aid Fund
- Placement drive and Campus Interviews
- Lead College Activities, Seminars, Workshops, State, National & International Conferences
- Innovation, Incubation and Invention Center
- Mentor-Mentee Scheme
- Art Circle
- Counseling Grievance Redressal Cell and Internal Complaint Committee
- Science Exhibitions, organisation of Rayat Inspire Camp
- College Magazine 'SADGURU'
- Active Alumni Cell
- Recipient of grants from UGC, DST & RUSA
- Scholarships and awards for Meritorious Students
- Organization of Trade Fair for Entrepreneurship Development
- College is preferred by International Students
- SGMC Bank
- Sadguru Career Academy

## BENEFITS OF AUTONOMY :

University Grants Commission motivates the colleges with **'A+'** Grade by NAAC to opt for autonomy. The autonomous status is received on the basis of academic reputation, performance of the college in university examinations, curricular, co-curricular, extension activities, achievements of the faculty, quality and merit of students and teachers, adequacy of infrastructure, institutional management, financial resources and involment of faculty in innovative reforms.

Autonomy improves the quality of higher education by offering the academic freedom to the affiliated colleges. The university with its common system and uniform rules and regulations for all the affiliating colleges makes it difficult to meet the varied needs of all the colleges. The blended (Hybrid) learning mode is adapted by college. To meet the excellence in the higher education systems it needs to offer academic flexibility to colleges in order to cope up with the local conditions.

The autonomous college has its own Governing Body, Academic Council, Board of Studies and Finance Committee along with the other statutory and academic committees.

**Benefits to Faculty and Students :**

| FACULTY | STUDENTS |
|---|---|
| ▸ Opportunity to prepare latest need-based curricula<br>▸ Gain flexibility to use more interactive methods<br>▸ Opportunity to extend resource at various bodies<br>▸ Helps upgrade content<br>▸ Scope for undertaking research oriented activities<br>▸ Widen horizon of knowledge<br>▸ Augmentation of facilities<br>▸ Scope for preparation of learning resources<br>▸ Reduces gap between teacher-student rapport<br>▸ Opportunity to enrich research pursuits | ▸ Avail sound learning environment<br>▸ Avail need-based and industry-required syllabus<br>▸ Avail diversified skill-oriented courses<br>▸ Inculcate skills and values<br>▸ Immediate Placement<br>▸ Quality students' strength<br>▸ Augmentation of infra structural facilities<br>▸ Avail quality support services<br>▸ Enhance self-employability<br>▸ Gain distinct identity<br>▸ Blended learning mode<br>▸ Research Projects |

## शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी स्वायत्तता व त्याचे फायदे :

विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालयास जून २०२४ पासून शैक्षणिक अधिकार प्रदत्त स्वायत्तता दिली असून महाविद्यालयाने मे २०१७ मध्ये नॅकची **'A+'** ग्रेड मिळवली आहे. शैक्षणिक स्वायत्तता प्राप्त झाल्यामुळे महाविद्यालयास अभ्यासक्रम बदल, विद्यमान कोर्सेसची पुनर्रचना, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम तयार करणे शक्य झाले आहे. महाविद्यालयाचा स्वतंत्र परीक्षा विभाग व मूल्यमापन यंत्रणा असलेमुळे परीक्षेचे नियोजन, निरंतर मूल्यमापन पध्दत, निकाल वेळेवर जाहीर करणे शक्य होणार आहे. ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतींचा वापर शिकविण्यासाठी केला जातो. पायाभूत सुविधा, परिणामकारक अध्ययन प्रक्रिया राबवणे, नाविन्यपूर्ण उपक्रम, नोकरीच्या संधी, स्वयंरोजगार व व्यवसाय निर्मितीस चालना इत्यादी यामुळे स्वायत्ततेचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी व रोजगार संधी वाढविण्यासाठी होईल.

# COURSES OFFERED

| Under Graduate (UG) Programmes | Post Graduate (PG) Programmes | Ph.D. |
|---|---|---|
| **SCHOOL OF LANGUAGES** | | |
| **Bachelor of Arts (B.A.) in**<br>Marathi<br>Hindi<br>English<br>Sanskrit (F.Y., S.Y.) | **Master of Arts (M.A.) in**<br>Marathi<br>Hindi<br>English | Marathi<br>Hindi<br>English |
| **SCHOOL OF SOCIAL SCIENCES** | | |
| **Bachelor of Arts (B.A.) in**<br>Economics<br>Geography<br>History<br>Philosophy<br>Political Science<br>Psychology<br>Sociology<br>Education (F.Y., S.Y.) | **Master of Arts (M.A.) in**<br>Economics<br>Geography<br>History<br>Political Science<br>Psychology<br>Sociology | History<br>Psychology |
| **SCHOOL OF COMMERCE AND MANAGEMENT** | | |
| **Bachelor of Commerce (B.Com.)**<br>1. Advanced Accountancy<br>2. Bank Management<br>3. Bachelor of Business Administration (B.B.A.) | **Master of Commerce (M.Com.)**<br>Accountancy<br>**M.Com. IT** | |
| **SCHOOL OF SCIENCES** | | |
| **Bachelor of Science (B.Sc.) in**<br>Botany<br>Chemistry<br>Computer Science<br>Electronics<br>Mathematics<br>Microbiology<br>Physics<br>Statistics<br>Zoology<br>Plant Protection (Subsidiary Level) | **Master of Science (M.Sc.) in**<br>Chemistry (Organic)<br>Chemistry (Analytical)<br>Computer Science<br>Mathematics<br>Microbiology (Industrial)<br>Statistics<br>Zoology (Animal Physiology)<br>Physics | Botany<br>Chemistry<br>Mathematics<br>Zoology<br>Physics |

## SCHOOL OF PROFESSIONAL COURSES

**Bachelor of Science (B.Sc.) in Biotechnology** (Entire)
**Bachelor of Computer Application (B.C.A.)**
**Bachelor of Commerce in** IT (B.Com. IT) (Entire)
**Bachelor of Science (B.Sc.) in Medicinal Chemistry**
**Bachelor of Science (B.Sc.) in Artificial Intellegence**
**Master of Science (M.Sc.) in Biotechnology**
**B.Sc. Computer Science Entire (B.C.S.)**
**Bachelor of Vocational Course (B.Voc.) in**
1) HMCT 2) Agriculture
**Bachelor of Science (B.Sc.) in Food Science**
**Bachelor of Science (B.Sc.) in Data Science**
**Master of Science (M.Sc.) in Data Science**

## ONE YEAR DIPLOMA COURSES

1. Hotel Management & Catering Technology
2. Hair Dressing, Beauty Therapy & Makeup
3. Advanced Fashion Designing & Technology
4. Yoga Therapy and Meditation

**Foreign Language Course :** German & French

# सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा

**● कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय शिक्षण ●**

**(ज्युनिअर कॉलेज विभाग)**

**स्थापना : १९५४**

ज्युनि. कॉलेज इंडेक्स नं. जे. २१.०२.००३

व्यवसाय शिक्षण विभाग ज्युनि. कॉलेज इंडेक्स नं. जे. २१.०२.९०२

### ▸ प्रस्तावना :

सद्‌गुरू गाडगे महाराजांच्या पुण्यवान नावाने इ. स. १९५४ मध्ये सुरू केलेल्या या कॉलेजची स्वत:ची खास वैशिष्ठ्ये आहेत. महाराष्ट्रात ख्यातनाम असलेल्या रयत शिक्षण संस्थेची शाखा म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जेव्हा हे कॉलेज कृष्णेच्या काठावर सुरू केले तेव्हा या भागात दुसरे कोणतेही कॉलेज नव्हते. आजही विद्यानगरमध्ये सर्वार्थांनी सर्वप्रथम म्हणून याच कॉलेजकडे पाहिले जाते. या कॉलेजमध्ये ज्युनिअर कॉलेज विभाग इ. स. १९७५ साली सुरू झाला.

### ▸ अभ्यासक्रम :

इयत्ता ११ वी व १२ वी आर्टस्, सायन्स, कॉमर्स व + २ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे.

### ▸ कॉलेजची वेळ :

इ. ११ वी व १२ कला व वाणिज्य शाखेचे वर्ग सकाळी ७.३० पासून सुरू होतील. आणि विज्ञान व व्यवसाय अभ्यासक्रम वर्ग सकाळी ११.०० पासून सुरू होतील.

### ▸ कार्यालयीन वेळ : सकाळी : १०.३० ते सायंकाळी ६.००

### ▸ वैशिष्ट्ये :

बोर्डाच्या सर्व परीक्षांमध्ये कॉलेजने नेहमीच स्पृहणीय यश मिळविले आहे. भव्य इमारत, सुसज्ज व अद्ययावत प्रयोगशाळा, समृध्द ग्रंथालय, प्रशस्त अभ्यासिका , ग्रंथपेढी, नामवंत, अनुभवी व व्यासंगी प्राध्यापक वर्ग, उत्कृष्ट निकालाची उज्ज्वल परंपरा, विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी भव्य वसतिगृहे, कमवा व शिका योजना, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व सवलती, वैयक्तिक मार्गदर्शन, कर्मवीर विद्याप्रबोधिनीमार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा, प्रशस्त क्रीडांगण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, इयत्ता १२ वी टॅलेंट बॅच,प्रोग्रेसिव्ह बॅच, सद्‌गुरू गुरूकुल प्रकल्प (SP) तसेच NDA स्वतंत्र वर्ग, सैन्यदल व पोलीसदल भरतीपूर्व प्रशिक्षण मार्गदर्शन केंद्र (निवासी), CA / CS फौंडेशन मागदर्शन वर्ग, इंजिनिअरींग व वैद्यकीय प्रवेश परीक्षा मार्गदर्शन वर्ग इ. या कॉलेजची खास वैशिष्ट्ये आहेत.

### ▸ वसतिगृह :

जून १९७२ पासून या कॉलेजच्या विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची सोय १९५४ पासूनच आहे. शुध्द हवा, स्वच्छ पाणी व आरोग्यवर्धक परिसर अशा या वसतिगृहात अल्पखर्चात राहता येते. विद्यार्थिनींच्या वसतिगृहात अल्प खर्चात

भोजनाची सोय उपलब्ध आहे. कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर वसतिगृहात प्रवेश मिळविण्यासाठी स्वतंत्र अर्ज वेळेत करावा लागतो.

### ▸ ग्रंथालय व अभ्यासिका :

अभ्यास उपयुक्त असे दिड लाखाचे वर ग्रंथ असलेले कॉलेजचे सुसज्ज ग्रंथालय आहे. मराठी, इंग्रजी, व हिंदी भाषेतील निरनिराळ्या विषयांची अनेक नियतकालिके ग्रंथालयात येतात. सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक ग्रंथांचा व नियतकालिकांचा स्वतंत्र विभाग तयार केला आहे. दुर्मिळ व सर्व तऱ्हेच्या संदर्भग्रंथांची संपन्नता आहे. अभ्यासासाठी प्रशस्त व सर्व सोयीनीयुक्त अशा अभ्यासिकेची व्यवस्था आहे. मुलींसाठी सायंकाळी ५ ते ७.३० व मुलांकरिता सायंकाळी ६ ते ११ या वेळेत चालू आहे. अत्याधुनिक डिजिटल ग्रंथालय उपलब्ध आहे.

### ▸ बुक बँक :

गरजू विद्यार्थ्यांना वर्षभर वापरण्यासाठी नाममात्र शुल्क घेवून क्रमिक पुस्तके बुक – बँक योजनेतून दिली जातात.

### ▸ एन्. एस्. एस्. :

कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० विद्यार्थ्यांचे दोन युनिट १९९७–९८ पासून कार्यान्वित आहे. या योजनेत विद्यार्थिनींनाही सहभागी होता येते. सध्या या योजनेचा लाभ १०० विद्यार्थी घेतात. या योजने अंतर्गत प्रत्येक वर्षी ०७ दिवसांचे विशेष श्रमसंस्कार शिबिर घेतले जाते.

### ▸ विविध स्पर्धा :

कर्मवीर जयंतीच्या निमित्ताने कॉलेजमध्ये दरवर्षी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पुष्प रचना व पुष्प रांगोळी स्पर्धा, चित्रकला व मेंदी स्पर्धा इ. चे आयोजन केले जाते. त्यातील विजेत्यांना योग्य ती बक्षिसे दिली जातात. तसेच क्रीडा स्पर्धांमध्ये नैपुण्य दाखविणाऱ्या खेळाडूंचा गौरव वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरणाचे वेळी (जिमखाना डे) केला जातो.

### ▸ जिमखाना :

कॉलेजमध्ये भव्य क्रीडांगण व सुसज्ज जिमखाना असून यामध्ये क्रिकेट,व्हॉलीबॉल, बास्केट बॉल, फुटबॉल, टेनिस, बॅडमिंटन, रिंग टेनिस, कबड्डी, खो–खो, कुस्ती इ. खेळांची सोय करण्यात आली आहे. या कॉलेजचे विद्यार्थी विविध खेळात राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले आहेत. १६ स्टेशन  मल्टी जिम व्यायाम साधनांची सोयही उपलब्ध करण्यात आलेली आहे.

### ▸ बहुउद्देशीय क्रीडा संकुल :

कॉलेजच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे माजी चेअरमन मा. ना. डॉ. पतंगरावजी कदम यांचे चिरंजीव अभिजित यांच्या नावाने कॉलेजमध्ये एकमेव अद्विितीय असे क्रीडा संकुल आहे. हे क्रीडासंकुल सर्व प्रकारच्या क्रीडा सुविधांनी सुसज्ज आहे.

### ▸ नियतकालिक व भित्तिपत्रक :

विद्यार्थ्यांच्या लेखनगुणांचा व अभ्यासवृत्तीचा योग्य आविष्कार व्हावा म्हणून **'सद्‌गुरू'** नियतकालिक प्रसिध्द होते. अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले **'सद्‌गुरू'** हे आमचे

नियतकालिक शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेमध्येच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या महाविद्यालयीन विश्वात दर्जेदार नि अग्रगण्य नियतकालिक म्हणून ओळखले जाते. याशिवाय हिंदी, इंग्रजी, मराठी, शास्त्र व वाणिज्य विभागातर्फे '**दिशा**' हे हस्तलिखित भित्तिपत्रकही प्रसिध्द होत असते.

### ▸ कलामंडळ व सहली :

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून कॉलेजमध्ये '**कलामंडळ**' चालविले जाते. यामार्फत विद्यार्थ्यांना विविध कलांचा आविष्कार करण्याची संधी दिली जाते. प्राध्यापकांच्या समवेत विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या ठिकाणी अभ्यास सहली आयोजित केल्या जातात.

### ▸ कॉलेजचा विद्यार्थी :

'**रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी**' या संज्ञेला समाजात काही विशेष अर्थ आहे. त्याने आपले आयुष्य 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' खर्च करावे अशी शिकवण त्याला दिली जाते. शिस्तबध्द आचरण आणि सर्वांगीण जीवनाचा विकास हे या कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे वैशिष्ट्य आहे. अभ्यासामध्ये येथील विद्यार्थी अग्रेसर असतात. तसेच येथील विद्यार्थी विविध परीक्षात सर्वप्रथम आलेले आहेत. कुस्ती, कबड्डी, टेबल–टेनिस इ. देशी–विदेशी खेळात तालुका, जिल्हा, राज्यस्तरावर आणि विद्यापीठामध्ये येथील विद्यार्थ्यांचा सन्मान होतो. वादविवाद, विविध नाट्यस्पर्धा इ. मध्ये ते चमकतात.

### ▸ विद्यार्थी कल्याण मंडळ व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र :

विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या व हिताच्या दृष्टीने हे मंडळ कार्यरत असते. विद्यार्थ्यांना सामुहिकरित्या आणि वैयक्तिकरित्या शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन केले जाते.

### ▸ विद्यार्थी दत्तक योजना :

विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी ही योजना कार्यरत आहे.

### ▸ बसची व्यवस्था :

कराड शहरातून कॉलेजकडे येण्यासाठी व परतण्यासाठी लोकल बसची व्यवस्था आहे. या बससाठी लागणारे पासेस, परगावहून येणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारे एस. टी. पासेस, जेवणाच्या डब्यासाठी लागणारे पासेस, ज्युनिअर कॉलेजच्या मुलींना आहिल्याबाई होळकर मोफत एस.टी. प्रवास पास योजना इत्यादींसाठी कॉलेजमधून शिफारस –पत्र घेतल्यास सवलती मिळतात. बसमधून प्रवास करताना विद्यार्थ्यांनी शिस्तीने व जबाबदारीने वागावे अन्यथा त्यांचा बस पास रद्द होतो.

### ▸ ओळखपत्र :

कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या गळ्यात ओळखपत्र असणे आवश्यक आहे. कॉलेजशी संबंधित असलेल्या कोणत्याही जबाबदार व्यक्तीने मागणी केल्यास ओळखपत्र सादर करावे लागेल. ओळखपत्र हरवल्यास एका आठवड्यात त्यासंबंधी लेखी कळवून नवीन ओळखपत्र घ्यावे. ओळखपत्रासाठी नेहमी रंगीत फोटो नेहमीच्या वेषात असलेला, गॉगल विरहित आणि स्टँप साईज असावा.

### ▶ ड्रेस कोड योजना :
दिवसेदिवस महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या वाढत असून ज्युनि. कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देता यावे यासाठी ज्युनि. कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी 'ड्रेस कोड' (युनिफॉर्म) अत्यावश्यक केला आहे. प्रवेशानंतर १५ दिवसाचे आत विद्यार्थ्याने (फॉर्मल) युनिफॉर्म शिवून घेणे आवश्यक आहे. दर बुधवारी ड्रेस कोडची सवलत राहील.

### ▶ इतर उपक्रम :
कॉलेजमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकचे अभ्यास केंद्र, राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूरच्या विद्यमाने 'विज्ञान मंच', पंतप्रधान रोजगार योजना प्रशिक्षण वर्ग, लोकसंख्या शिक्षण मंडळ, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग, अंधश्रध्दा निर्मूलन, संगणक प्रशिक्षण वर्ग इत्यादी उपक्रम चालविले जातात. महात्मा गांधी ट्रस्ट, जळगाव यांचे वतीने महात्मा गांधीच्या जीवनावर विशेष परीक्षा घेतली जाते.

### ▶ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग (Talent Batch) :
इ. १२ वी कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम विद्याशाखांकडील विशेष गुणवंत व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी वर्षभर मार्गदर्शन वर्ग, चर्चासत्रे , विविध चाचणी परीक्षा घेतल्या जातात. अभ्यासक्रमाचे अध्यापन, स्पष्टीकरण व समस्या निराकरण केले जाते. संबंधित विद्यार्थ्यांचा विद्यार्थी – शिक्षक – पालक मेळावा आयाजित करून योग्य ते मार्गदर्शन केले जाते. सदर मेळाव्यात विद्यार्थी व पालकांच्या अडचणी विचारात घेऊन त्यांचे निराकरण केले जाते. इ. ११ वी व १२ वी विद्यार्थ्यांसाठी वर्षभर JEE व MH-CET प्रवेश परीक्षा मार्गदर्शन वर्ग घेतले जातात.

### ▶ अप्रगत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग (Progressive Batch) :
इ. १२ वी सायन्सच्या अप्रगत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन वर्ग घेतले जातात, अध्ययन जास्तीत जास्त सुलभ पध्दतीने होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले जातात. या विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी व अध्ययन यांची योग्य सांगड घालून उज्ज्वल भवितव्यासाठी प्रयत्न केले जातात. तसेच चाचणी परीक्षा घेऊन योग्य ते मार्गदर्शन केले जाते.

### ▶ क्रॅश कोर्स :
इ. १२ वी नंतर अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशासाठी NEET, JEE व MH-CET क्रॅश क्रोर्स चालवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. C.A, C.S. फाऊंडेशन कोर्स मार्गदर्शन वर्ग.
**इतर कोर्स –** पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, वुमेन्स मिलिटरी ॲकॅडमी

## । प्रवेशासंबंधी नियम ।
०१. एस्. एस्. सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांस ज्युनिअर कॉलेजच्या पहिल्या वर्गामध्ये (इ. ११ वी ) मध्ये प्रवेश मिळेल.

०२. सायन्स विभागात प्रवेशासाठी एस्. एस्. सी. परीक्षेमध्ये सायन्स व गणित विषयात किमान ३५% गुण आवश्यक आहेत.

०३. प्रवेशाची पध्दत – प्रवेशाच्या वेळी प्रवेश अर्जासोबत गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड यांची प्रत्येकी २ झेरॉक्स प्रत सादर करावी. प्रवेश निश्चित करताना गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश दिला जाईल. अंतिम प्रवेशाच्या वेळी गुणपत्रके, शाळा

सोडल्याचा दाखला, यांच्या मूळ प्रती सादर करून योग्य ती फी भरून प्रवेश घ्यावा. प्रवेश अर्जावर आयकार्ड साईज फोटो पाहिजे.

०४. प्रवेश अर्जावर विषयासमोर त्या विषयाचा कोड नंबर लिहिणे आवश्यक आहे.

०५. विद्यार्थ्यांनी अंतिम प्रवेशानंतर १५ दिवसांच्या आत सर्व प्रकारच्या फी सवलतीचे अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालयात संबंधित विभागाकडे न चुकता सादर करावेत.

०६. महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळाव्यतिरिक्त इतर बोर्डातील व महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांनी पात्रता (Eligibility) प्रमाण पत्राची पूर्तता ३१ ऑगस्टपूर्वी करावी अन्यथा प्रवेश रद्द होतो.

## अभ्यासक्रम :

**एफ्. वाय्. जे. सी. (इ. ११ वी )** व **एस्. वाय्. जे. सी. (इ. १२ वी)** साठी खालील विषय शिकविण्याची सोय आहे.

### । इ. ११ वी (आर्टस्) ।

| आवश्यक विषय | ऐच्छिक विषय |
|---|---|
| ०१. इंग्रजी | ०१. हिंदी / अर्थशास्त्र/ तत्वज्ञान |
| ०२. मराठी | ०२. समाजशास्त्र / सहकार |
| ०३. पर्यावरणशास्त्र | ०३. भूगोल / मानसशास्त्र |
| ०४. शारीरिक शिक्षण | ०४. इतिहास /राज्यशास्त्र / संस्कृत/ अर्धमागधी |

**✻ ऐच्छिक विषयाच्या वरील प्रत्येक गटातील एक विषय या प्रमाणे एकूण चार विषय निवडावेत.**

**✻ शासन निर्णयानुसार १० वी ए.टी.के.टी. च्या विद्यार्थ्यांना इ. ११ वीत प्रवेश दिला जाईल.**

### । इ. १२ वी (आर्टस्) ।

| आवश्यक विषय | ऐच्छिक विषय |
|---|---|
| ०१. इंग्रजी | ०१. हिंदी / अर्थशास्त्र/ तत्वज्ञान |
| ०२. मराठी | ०२. समाजशास्त्र / सहकार |
| ०३. पर्यावरणशास्त्र | ०३. भूगोल / मानसशास्त्र |
| ०४. शारीरिक शिक्षण | ०४. इतिहास /राज्यशास्त्र / संस्कृत/ अर्धमागधी |

**✻ ऐच्छिक विषयाच्या वरील प्रत्येक गटातील एक विषय या प्रमाणे एकूण चार विषय निवडावेत.**

**इ. ११ वी व १२ वी सायन्स तसेच ११ वी व १२ वी कॉमर्स विनाअनुदानित वर्गाच्या प्रवेशासाठी शासन नियमानुसार फी भरावी लागेल.**

### । इ. ११ वी व इ. १२ वी – कॉमर्स (मराठी माध्यम) ।

| आवश्यक विषय | ऐच्छिक विषय |
|---|---|
| ०१. इंग्रजी | ०१. मराठी / बँकिंग १ |
| ०२. पर्यावरणशास्त्र | ०२. बुक किपिंग अॅन्ड अकौंन्टन्सी |
| ०३. शारीरिक शिक्षण | ०३. व्यापार संघटन व व्यवस्थापन |

०४. अर्थशास्त्र

०५. चिटणीसांचा व्यवसाय/सहकार/बँकिंग २/गणित

टीप : (इ. ११ वी, १२ वी कॉमर्स मराठी माध्यमसाठी)

१) बँकिंग विषयाची प्रवेश क्षमता ५० इतकी मर्यादित असून संबंधित विद्यार्थ्यांना मराठी हा विषय घेता येणार नाही. तसेच ज्यांना बँकिंग हा विषय घ्यावयाचा आहे त्यांनी बँकिंग १ व बँकिंग २ असे दोन्ही विषय निवडणे अनिवार्य आहे.

२) बँकिंग विषयाचा प्रवेश शासकीय नियमाप्रमाणे गुणवत्तेनुसार होईल.

३) बँकिंग व गणित विषयाची फी वेगळी राहील.

**I XI, XII Commerce (English Medium)**

| **Compulsory Subject** | **Optional Subject** |
|---|---|
| 01. English | 01. Marathi / IT |
| 02. Environmental Science | 02. Book Keeping & Accountancy |
| 03. Physical Education | 03. Organisation of Commerce & Management |
| | 04. Economics |
| | 05. Secretarial Practice / Mathematics |

**Note :** 1) Intake Capacity of IT subject is 150

2) Fees for IT & Maths will be charged separately.

३) वरील अभ्यासक्रमासाठी शासन आदेशानुसार फी द्यावी लागेल.

4) C.A. / C.S. फाऊंडेशन कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सोय व फी वेगळी राहील

**। इ. ११ वी (सायन्स) व इ. १२ वी (सायन्स) ।**

| **आवश्यक विषय** | **ऐच्छिक विषय** (खालील १२ पैकी कोणताही एक गट निवडावा) |
|---|---|
| ०१. इंग्रजी | **गट १ :** मराठी / गणित / जीवशास्त्र |
| | **गट २ :** मराठी / भूगोल / जीवशास्त्र |
| ०२. पर्यावरणशास्त्र | **गट ३ :** मराठी / कृषि विज्ञान व तंत्रज्ञान / जीवशास्त्र |
| ०३. शारीरिक शिक्षण | **गट ४ :** मराठी / गणित / संरक्षणशास्त्र |
| ०४. भौतिकशास्त्र | |
| ०५. रसायनशास्त्र | **गट ५ :** संस्कृत / गणित / जीवशास्त्र |
| | **गट ६ :** संस्कृत / भूगोल / जीवशास्त्र (फक्त १२ वी विद्यार्थ्यांसाठी) |
| | **गट ७ :** आय.टी. / गणित / जीवशास्त्र |
| | **गट ८ :** आय.टी. / गणित / भूगोल (फक्त १२ वी विद्यार्थ्यांसाठी) |
| | **गट ९ :** गणित / इलेक्ट्रॉनिक्स I / इलेक्ट्रॉनिक्स II |
| | **गट १० :** गणित / कॉम्पयुटर सायन्स I / कॉम्पयुटर सायन्स II |
| | **गट ११ :** गणित / टेक्निकल I / टेक्निकल II |

* टीप : ०१. **माहिती तंत्रज्ञान** या विषयाची प्रवेशक्षमता १०० इतकी मर्यादित राहील.

०२. **इलेक्ट्रॉनिक्स्** या विषयाची प्रवेशक्षमता २०० इतकी मर्यादित राहील.

०३. **कॉम्प्युटर सायन्स** या विषयासाठी प्रवेश क्षमता १५० इतकी मर्यादित राहील.

०४. **टेक्नीकल** या विषयासाठी प्रवेश क्षमता ५४ इतकी मर्यादीत राहील.
०५. माहिती तंत्रज्ञान, इलेक्टॉनिक्स् व कॉम्प्युटर सायन्स हे विषय कायम विनाअनुदानित असल्याने सदर विषयाची फी शासनाच्या नियमानुसार राहील.
०६. माहिती तंत्रज्ञान इलेक्ट्रॉनिक्स,टेक्नीकल व कॉम्प्युटर सायन्स विषयाचे प्रवेश शासकीय नियमानुसार गुणवत्तेवर दिले जातील.
०७. कृषिविज्ञान व तंत्रज्ञान या विषयाची प्रवेशक्षमता ४० इतकी मर्यादित राहील. बी.एस्सी ॲग्री प्रवेशासाठी ८% मार्क वाढतात.
०८. संरक्षणशास्त्र या विषयाची प्रवेश क्षमता ४० इतकी मर्यादित राहील.
०९. इ. ११ वी मध्ये निवडलेला विषय गट इ. १२ वी मध्ये बदलता येणार नाही.

**टेक्नीकल : (अकरावी व बारावी सायन्ससाठी ) :**

अ) इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स : (Electrical Maintenance) प्रवेश मर्यादा १५
ब) मेकॅनिकल मेन्टेनन्स : (Mechanical Maintenance) प्रवेश मर्यादा २४
क) स्कूटर ॲण्ड मोटार सायकल सर्व्हिसिंग : (Scooter and Motor cycle Servicing ) प्रवेश मर्यादा १५

* टीप : ०१. वरील अभ्यासक्रम घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने स्वतंत्र प्रवेश अर्ज भरून द्यावा.
०२. गुणवत्ता व आरक्षण विचारात घेऊन प्रवेश दिला जातो.
०३. या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास मराठी, हिंदी, संस्कृत, जीवशास्त्र व माहिती तंत्रज्ञान हे विषय घेता येणार नाहीत.
०४. वरील अभ्यासक्रमासाठी शासकीय नियमानुसार फी भरावी लागेल.

**इयत्ता ११ वी, १२ वी शिकविल्या जाणाऱ्या विषयांचे कोड नं. खालीलप्रमाणे आहेत. (आर्टस्, सायन्स, व कॉमर्स )**

| विषय | कोड नं. | विषय | कोड नं. | विषय | कोड नं. |
|---|---|---|---|---|---|
| इंग्रजी | ०१ | मराठी | ०२ | हिंदी | ०४ |
| संस्कृत | ३३ | अर्धमागधी | १६ | इतिहास | ३८ |
| भूगोल | ३९ | गणित आणि संख्याशास्त्र (विज्ञान) | ४० | राज्यशास्त्र | ४२ |
| समाजशास्त्र | ४५ | तत्वज्ञान | ४६ | मानसशास्त्र | ४८ |
| अर्थशास्त्र | ४९ | बुक किपींग ॲण्ड अकौन्टन्सी | ५० | व्यापार संघटन | ५१ |
| चिटणीसाचा व्यवसाय | ५२ | सहकार | ५३ | भौतिकशास्त्र | ५४ |
| रसायनशास्त्र | ५५ | जीवशास्त्र | ५६ | इलेक्ट्रिकल मेन्टेनन्स | ए१ |
| मेकॅनिकल मेन्टेनन्स | ए२ | स्कूटर ॲण्ड मोटार सायकल सर्व्हिसिंग | ए३ | बँकिंग | ए५ |
| इलेक्ट्रॉनिक्स | सी२ | | | माहिती तंत्रज्ञान (विज्ञान) | ९७ |
| कृषि विज्ञान व तंत्राज्ञान | ७५ | शारीरिक शिक्षण | ३० | माहिती तंत्रज्ञान (वाणिज्य) | ९९ |
| सरंक्षणशास्त्र | ७७ | गणित आणि संख्याशास्त्र (कॉमर्स | ८८ | पर्यावरणशास्त्र | ३१ |
| | | | | कॉम्प्युटर सायन्स | डी९ |

**सर्व भाषा आणि कला, वाणिज्य शाखेतील इतर सर्व विषयासाठी २० गुणांची तोंडी परीक्षा राहील.**

## । एच. एस. सी. व्होकेशनल (व्यवसाय अभ्यासक्रम) ।

## । इ. ११ वी आणि १२ वी ।

केंद्र शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार इ. १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी खालील अनुदानित व्यवसाय अभ्यासक्रम १९८९ पासून सुरू आहेत.

**तांत्रिक गट :** ( Technical Group )

०१. इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (Electronics Technology) :
**प्रवेश क्षमता – ३०**

०२. इलेक्ट्रीकल टेक्नॉलॉजी (Electrical Technology) :
**प्रवेश क्षमता – ३०**

**वाणिज्य गट :** ( Commerce Group)

०१. अकौंटींग ॲण्ड ऑफिस मॅनेजमेंट (Accounting & Office Management) :
**प्रवेश क्षमता – ४०**

०२. बँकिंग ॲण्ड इन्शुरन्स (Banking & Insurance) :
**प्रवेश क्षमता –४०**

### ▸ व्यवसाय अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये :

०१. अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास शासनाच्या वतीने व्होकेशनल टेक्निशियन म्हणून प्रमाणपत्र मिळते.

०२. उमेदवारी कायदा १९६१ नुसार उमेदवारीचा (ॲप्रेन्टिसशिपचा) लाभ घेता येतो.

०३. उमेदवारी योजनेनुसार दरमहा रू. २७९०/– विद्यावेतन.

०४. वाणिज्य गटातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वरिष्ठ महाविद्यालयात एफ्. वाय्. बी. ए. व एफ्. वाय्. बी. कॉम. साठी प्रवेश मिळतो.

०५. विद्यार्थ्यांना नोकरी व स्वयंरोजगाराची संधी मिळते.

०६. प्रवेशासाठी किमान पात्रता इ. १० वी पास असून प्रवेश गुणवत्तेनुसारच दिला जातो.

०७. अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षाचा आहे.

०८. अभ्यासक्रमाच्या कालावधीत विद्यार्थ्यांना कारखान्यामध्ये – आस्थापनामध्ये प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटीचे आयोजन केले जाते.

०९. संगणक प्रशिक्षणाची सोय.

१०. इ. ११ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी **ऑन दी जॉब ट्रेनिंग**

११. इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजीच्या इ. १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना Diploma in Eng. द्वितीय वर्षात प्रवेश तसेच B.A/ B.Com. / B.Sc. च्या प्रथम वर्षात प्रवेश.

## विषय आणि कोड नंबर :

**1) Electronics Technology :**

XI — 1. Basic Electricity — 2. Basic Electronics — 3. Digital Electronics

XII — 1. Applied & Industrial Electronics
2. Modern Instrument & Communicaton System
3. Computer Hardware & Networking

**प्रवेश क्षमता –३०**

**2) Electrical Technology :**

XI & XII — 1. Electrical Wirinig — 2. Electrical Appliences — 3. Electrical Machine

**प्रवेश क्षमता –३०**

**3) Accounting & Office Management :**

XI — 1. Office Management & Organization
2. Fundamentals of Accounting
3. Fundamentals of Costing & Auditing

XII — 1. Office Motivation
2. Advanced Financial Accounting
3. Advanced Costing & Auditing

**प्रवेश क्षमता –४०**

**4) Banking, Financial Services & Insurance :**

XI — 1. Fundamentals of Accounting
2. Fundamentals of Banking & Finance
3. Life Insurance

XII — 1. Advanced Accounting & Computer Application
2. Banking Services & Capital Markets
3. General Insurance

**प्रवेश क्षमता –४०**

## ▸ कॉलेज मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे नियोजन :

याशिवाय इ. १२ वी आर्टस्, कॉमर्स, व व्यवसाय शिक्षण विभागातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी विषयाच्या Mid Term-I Mid Term-II आणि एक जादा सराव परीक्षा घेतल्या जातात.

**इयत्ता १२ वी च्या जादा परीक्षांचे वेळापत्रक ज्या त्या वेळी जाहीर करण्यात येईल.**

टीप : वरील नियोजनात काही बदल झाल्यास तो बदल ज्या त्या वेळी कळविण्यात येईल.

| अ.न. | परीक्षेचे नाव | वर्ग | महिना | आठवडा |
|---|---|---|---|---|
| ०१. | ट्युटोरियल क्र. १ | ११ वी व १२ वी | ऑगस्ट | दुसरा |
| ०२. | युनिट टेस्ट क्र. १ | ११ वी | सप्टेंबर | दुसरा |
| ०३. | सत्र १ / सहामाही परीक्षा | ११ वी व १२ वी | ऑक्टोबर | तिसरा |
| ०४. | ट्युटोरियल क्र. ३ | ११ वी व १२ वी | डिसेंबर | तिसरा |
| ०५. | युनिट टेस्ट क्र. २ व सायन्स सराव परीक्षा १ | ११ वी व १२ वी | डिसेंबर | चौथा |
| ०६. | सराव परीक्षा | इ. १२ वी | जानेवारी | पहिला |
| ०७. | सत्र २ | इ. ११ वी | मार्च | तिसरा |

## ▸ फी संबंधी माहिती

**ज्युनिअर कॉलेज/व्यवसाय शिक्षण विभाग :**

| फी चा तपशील | एफ. वाय. जे.सी. | एस. वाय. जे.सी. | व्यवसाय शिक्षण | |
|---|---|---|---|---|
| | | | इ. ११ वी | इ. १२ वी |
| प्रवेश फी | १६ | १८ | २० | २५ |
| शिक्षण फी | १९२ | २१६ | २४० | ३०० |
| सत्र फी | ३२ | ३६ | ४० | ५० |
| कॉलेज परीक्षा | ९० | ९० | ११० | ११० |
| नियतकालिक | १५ | १५ | १५ | १५ |
| विद्यार्थी कल्याण निधी | १० | १० | १० | १० |
| इमारत व विकास निधी आर्टस : | ६२० | ६२० | -- | -- |
| कॉमर्स : | ८७० | ८७० | १२०० | १२०० |
| इमारत व विकास निधी (सायन्स) | २८७० | २८७० | टेक्नी. ग्रुप १२०० | टेक्नी.ग्रुप १२०० |
| प्रयोगशाळा फी (फक्त सायन्स व व्यवसाय शिक्षण विद्यार्थ्यासाठी) | ७० | ७० | ८० | १०० |
| ध्वजनिधी | ५ | ५ | ५ | ५ |
| आपत्कालीन निधी | १० | १० | १० | १० |

**Online Admission Fee Payment :**

| | | |
|---|---|---|
| Bank Name | : | The Rayat Sevak Co-Operative Bank Ltd., |
| Branch Name | : | Karad |
| Account Name | : | Principal, S.G.M. College, Karad |
| Account No. | : | 016036000002 |
| IFSC Code | : | IBKL0485RSC |

Online Payment Confirm **झालेनंतर सदर** Payment **चे** Fee Receipt **(महाविद्यालयामधील प्रवेश)** Payment Confirm **झालेनंतर ४ दिवसाच्या आत घेवून जावे.**

## ▸ कर्मवीर विद्यार्थी वसतिगृह / न्यू बॉईज होस्टेल :

०१. **प्रवेश क्षमता १६८ :** मुलांना वसतिगृहामध्ये प्रवेश घ्यावयाचा असल्यास वसतिगृहाचा स्वतंत्र प्रवेश अर्ज भरून द्यावा लागतो. अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रकाची झेरॉक्स जोडणे आवश्यक असते. प्रवेश अर्जाच्या पाठीमागील बाजूवर वसतिगृहाचे सर्व नियम दिलेले आहेत. अंतिम प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

०२. **तक्रार निवारण :** वसतिगृह कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र समिती निर्माण केली असून सदर समिती मार्फत विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण केले जाते.

०३. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची दररोज रात्री ९.३० वाजता हजेरी घेतली जाते.

०४. घरी किंवा परगावी जाताना विद्यार्थ्यांनी मा. रेक्टर यांचेकडे लेखी अर्ज करून परवानगी घेणे आवश्यक असते.

०५. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध असून स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते.

०६. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य राखण्यासाठी आणि अभ्यासाव्यतिरिक्त त्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचे निवारण करण्यासाठी रेक्टर व वसतिगृह समिती सतत प्रयत्नशील असते.

०७. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याच्या उद्देशाने तज्ज्ञ प्राध्यापकांची वेळोवेळी व्याख्याने आयोजित केली जातात.

०८. वसतिगृहात राहून गैरवर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केली जाते.

०९. कर्मवीर विद्यार्थी वसतिगृहासंबंधी अधिक माहितीसाठी वसतिगृहाचे **रेक्टर प्रा. डी. बी. जाधव** यांना भेटावे.

## ▸ वसतिगृहाची ठळक वैशिष्ट्ये :

०१. विद्यार्थी वसतिगृहाची भव्य व स्वतंत्र इमारत, प्रशस्त खोल्या. प्रत्येक खोलीमध्ये फक्त दोनच विद्यार्थी.

०२. अत्यावश्यक सर्व सोयी.

०३. स्वच्छ व भरपूर पाणी व रम्य परिसर

०४. दररोज वाचनासाठी दै. वर्तमानपत्रे.

०५. वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी कमवा व शिका योजना.

०६. गुणवत्तेनुसार प्रवेश.

०७. विद्यार्थ्यांना अंघोळीसाठी सोलर वॉटर हिटर सुविधा.

०८. विद्यार्थ्यांसाठी प्रथमोपचाराची सोय.

०९. गरीब व हुशार मुलांसाठी शिष्यवृत्ती मिळवून देण्याचा प्रयत्न.

१०. वसतिगृहाची माफक फी.

११. वसतिगृहाच्या विद्यार्थ्यांसाठी रात्र–अभ्यासिकेची सोय.

१२. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रम.

## ▸ सौ. सुमतिबाई पांडुरंग पाटील विद्यार्थिंनी वसतिगृह :

**। वसतिगृहाची ठळक वैशिष्ट्ये ।**

०१. विद्यार्थिनी वसतिगृहाची भव्य व स्वतंत्र इमारत.
०२. अत्यावश्यक सर्व सोयी व आरक्षण
०३. शुध्द हवा, स्वच्छ पाणी, सकस भोजन, आरोग्यवर्धक परिसर.
०४. दैनिक वर्तमानपत्रे, शैक्षणिक उपक्रम, वैयक्तिक मार्गदर्शन.
०५. व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रम.
०६. कमवा व शिका योजना.
०७. परगावच्या मुलींना प्रवेशासाठी प्रथम प्राधान्य.
०८. मागासवर्गीय मुलींना प्राधान्य.
०९. गरीब, हुशार, व होतकरू मुलींना प्रवेशासाठी प्राधान्य.
१०. **'ना नफा ना तोटा'** तत्वावर भोजनाची व्यवस्था (मुलींकडून मुलींसाठी मेस चालविली जाते.)
११. प्रवेश प्रक्रिया : मुलींना वसतिगृहामध्ये प्रवेश देतेवेळी त्यांचेकडून प्रवेश अर्ज व प्रतिज्ञापत्र घेतले जाते. प्रतिज्ञापत्रावर मुलीसोबत आई – वडिलांचा फोटो घेतला जातो. नियमांचा अंतर्भाव असणारी नोंद पुस्तिका दिली जाते. या नोंदपुस्तिकेवर संबंधित विद्यार्थिनीच्या वसतिगृहामध्ये येण्या–जाण्याच्या वेळेची नोंद केली जाते.
१२. मुलींच्या तक्रारीचे निवारण वसतिगृह समितीमार्फत केले जाते. हीच समिती वसतिगृहाचे व्यवस्थापन पाहते. चेअरमन, व्हा चेअरमन, रेक्टर व सदस्य मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनानुसार कामकाज पाहतात.
१३. मुलींच्या आरोग्यासंदर्भात काळजी घेतली जाते. आरोग्यविषयक विविध बाबींबर डॉक्टरांची व्याख्याने आयोजित केली जातात. आरोग्यविषयक प्रश्न निर्माण होऊ नयेत म्हणून पाणी, भोजन व परिसराची काळजी घेतली जाते.
१४. महिला प्राध्यापकांना वसतिगृहामध्ये निमंत्रित करून संबंधित विषयासंदर्भात वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते.
१५. वसतिगृहामध्ये काम करणाऱ्या सेवकांची २४ तास सेवा उपलब्ध असते.
१६. शैक्षणिक अडचणी व्यतिरिक्त इतर अडीअडचणींसदर्भात चेअरमन, व्हा. चेअरमन, रेक्टर व महिला सदस्य मुलींशी संपूर्ण वर्षभर संवाद साधतात. जेणेकरून त्यांचे मानसिक आरोग्य जपले जाते.
१७. रात्री – अपरात्री मुलगी आजारी पडल्यास ताबडतोब त्या मुलीस डॉक्टरांकडे नेऊन उपचार केले जातात. आवश्यकता भासल्यास हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले जाते व मुलींच्या आई – वडिलांना कळविले जाते. आई – वडील येईपर्यंत त्या मुलीचे रूम पार्टनर, रेक्टर व अन्य सेवक मुलीची काळजी घेतात.
१८. सौ. सुमतिबाई पांडुरंग पाटील विद्यार्थिनी वसतिगृहासंबंधी अधिक माहितीसाठी वसतिगृहाचे **रेक्टर प्रा. बी. एच. पाटील** यांना भेटावे.

## विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना :

विद्यार्थ्यांचा या कॉलेजमध्ये प्रवेश निश्चित झाल्यानंतर आवश्यक तो फी सवलतीचा अर्ज १५ दिवसाच्या आत कॉलेज कार्यालयात भरून देणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यास संपूर्ण फी भरावी लागेल.

## पात्र विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती

### ● शिष्यवृत्तीसाठी सर्वसाधारण सूचना ●

१. विद्यार्थ्याचे स्वत:चे खाते राष्ट्रीयकृत बँकेत असणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्याच्या आधारकार्डवरील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे.
३. सदरचे बँक खाते विद्यार्थ्याच्या आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.
४. विद्यार्थ्याचा मोबाईल आधार कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.
५. विद्यार्थ्यास एका शैक्षणिक वर्षात कोणतीही एकच शिष्यवृत्ती स्विकारता येईल.

### ● शिष्यवृत्ती अर्ज भरताना लागणारी कागदपत्रे ●

१. आधार कार्ड २. जातीचा दाखला ३.डोमोसाईल सर्टिफिकेट ४. उत्पन्नाचा दाखला
५. शाळा सोडल्याचा दाखला ६.दहावी व त्यापुढील सर्व गुणपत्रके ७.लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र
८. रेशन कार्ड झेरॉक्स ९.महाविद्यालय प्रवेश पावती १०.बँक पासबुक
११. शैक्षणिक गॅप असेल तर गॅप सर्टिफिकेट

## ● राज्य शासन पुरस्कृत विविध शिष्यवृत्ती ●

### विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय विभाग

१. विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
२. विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदान (फ्रीशिप)
३. इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
४. इमाव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदान (फ्रीशिप)
५. विमा प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
६. विमा प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रदान (फ्रीशिप)
७. इ. १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इ. ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या व १२ वी मध्ये शिकणाऱ्या विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.

### ● सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ●

१. भारत सरकार पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना
२. पोस्ट-मॅट्रिक ट्यूशन फी आणि परीक्षा फी (फ्रीशिप)
३. पोस्ट-मॅट्रिक शिष्शवृत्ती (दिव्यांग विद्यार्थ्यासाठी)
४. राजर्षी छत्रपती शाहू महाराज मेरिट स्कॉलरशिप

### ● अदिवासी विकास विभाग ●

१. भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती
२. अनुसूचित जमाती विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा फी (फ्रीशिप)

### ● शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ●

१. ओपन मेरीट शिष्यवृत्ती
२. आर्थिकदृष्ट्या मागासलेले विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती

### ● छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती ●

## • केंद्र शासन पुरस्कृत विविध शिष्यवृत्ती (एन.एस.पी. पोर्टल)•

| • शालेय शिक्षण विभाग • | • दिव्यांग सक्षमीकरण विभाग • |
|---|---|
| राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना | अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती |

## • शिष्यवृत्ती आणि फ्रीशिपसाठी उत्पन्न मर्यादा •

| जातीचा प्रवर्ग | शिष्यवृत्ती मर्यादा | फ्रीशिप मर्यादा | जातीचा प्रवर्ग | शिष्यवृत्ती मर्यादा | फ्रीशिप मर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| एस. सी. | २.५० लाखापर्यंत | २.५० लाखाच्या पुढे | एस. बी. सी. | १.५० लाखापर्यंत | ८ लाखाच्या आत |
| एस. टी. | २.५० लाखापर्यंत | २.५० लाखाच्य पुढे | व्ही.जे.एन.टी. | १.५० लाखापर्यंत | ८ लाखाच्या आत |
| ओ. बी. सी. | १.५० लाखापर्यंत | ८ लाखाच्या आत | ओपन | ८ लाखापर्यंत | |

**अधिक माहितीसाठी संपर्क : श्री. ए. डी. जावीर (कार्यालय विभाग) संपर्क क्रमांक : ७६२०२ ८७७०७**

## कॉलेजने देऊ केलेल्या सवलती :

०१. गरीब विद्यार्थी निधीमधून गरजू विद्यार्थ्यांना कामाच्या मोबदल्यात मदत.

०२. बुक बँकेतून पुस्तके पुरविण्याची सोय.

०३. इयत्ता ११ वी सायन्समध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना पुस्तकांचा संपूर्ण संच मोफत देण्यात येईल.
(वर्षभर वापरासाठी)

०४. कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य.

०५. विद्यार्थी वसतिगृह व विद्यार्थिनी वसतिगृह यामध्ये खास सोयी व सवलती.

०६. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणींचा वैयक्तिक विचार करून शैक्षणिक सवलती.

०७. प्रथितयश खेळाडूंना प्रोत्साहन व फी मध्ये सवलती.

०८. निराधार, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना कॉलेजच्या नियमांना अनुसरून आर्थिक व शैक्षणिक मदत दिली जाईल.

टीप : वरील विशेष सवलती विद्यार्थ्यांची वर्तणूक, अभ्यासातील प्रगती, हजेरीतील नियमितपणा व आर्थिक निकष इत्यादींचा विचार करून दिल्या जातात.

## पारितोषिक :

- **कै. सौ. सरस्वतीबाई दत्ताजीराव कुराडे पारितोषिक**
  इ. १२ वी आर्टस्, सायन्स व कॉमर्स परीक्षेमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.
- **य. बा. पाटील उर्फ आबासाहेब पार्लेकर पारितोषिक**
  इ. १२ वी कॉमर्समध्ये प्रथम येवून याच कॉलेजमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास हे पारितोषिक देण्यात येते.
- **मा. यशवंतराव जिजाबा मोहिते व सौ. जाईताई यशवंतराव मोहिते पारितोषिक**
  अनुक्रमे मुलांमध्ये व मुलींमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास व विद्यार्थिनीस हे पारितोषिक देण्यात येते.

- **मा. जयसिंगराव पांडुरंग काळे पारितोषिक**
  इ. १२ वी भौतिकशास्त्र विषयात प्रथम तीन येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.

**▸ सरकारी व इतर शिष्यवृत्त्या आणि सवलती :**

या कॉलेजमधील विद्यार्थ्यासाठी पुढील शिष्यवृत्त्या व शुल्क सवलती उपलब्ध आहेत. त्यासाठी विद्यार्थ्याने ३१ जुलैपूर्वी कॉलेजकडे अर्ज करावा. सदरचे अर्ज कॉलेजमध्ये मिळतील.

- इ. बी. सी. विद्यार्थ्यांना सरकारी फीची तरतूद करून दिली जाते.
- वर्गीकृत जाती, वर्गीकृत जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व फी सवलती उपलब्ध करून दिल्या जातात.
- हुशार विद्यार्थ्यांना गव्हर्नमेंट ओपन मेरिट स्कॉलरशिप मिळवून देण्याचे प्रयत्न केले जातात. त्यासाठी एस्.एस्.सी. व एच्.एस्.सी. अगर तत्सम परीक्षेमध्ये शे. ६०% अगर त्यापेक्षा अधिक गुण असावे लागतात.
- हुशार विद्यार्थ्यांना गव्हर्नमेंट ओपन मेरिट फ्री स्टुडंटशीप मिळवून दिली जाते.
- वॉर कन्सेशन मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. सदर सवलतीसंबंधी माहिती ऑफिसमध्ये मिळेल.
- गव्हर्नमेंट ऑफ इंडिया नॅशनल स्कॉलरशिप मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. त्यासाठी एस्. एस्. सी. व एच्. एस्. सी. अगर तत्सम परीक्षेमध्ये शे. ६०% अगर त्यापेक्षा अधिक गुण असावे लागतात.
- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना सरकारकडून फीमध्ये सवलत मिळवून दिली जाते.
- स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना फीमध्ये सवलती मिळवून दिल्या जातात.
- अपंग विद्यार्थ्यांना शासकीय सवलती व शिष्यवृत्त्या मिळवून दिल्या जातात.
- एक वेळ नापास झालेल्या बी. सी. मुलांना फीमध्ये सवलती मिळवून दिल्या जातात.
- शिक्षकांच्या मुलांना गुणवत्ता शिष्यवृत्ती.
- संस्कृत व अर्धमागधी शिष्यवृत्ती.
- विविध फंडातून मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या.
- रयत शिक्षण संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना पारितोषिक मिळण्याची सोय.

**▸ खेळाडूंसाठी खास सवलती :**

**एच. एस. सी. मंडळ मान्यतेनुसार इ. १२ करिता**

- राज्य/राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत भाग घेतला असेल तर मंडळाच्या तरतूदीनुसार त्यास जास्तीत जास्त १५/२५ जादा सवलतीचे गुण मिळतील.

## ▸ शिस्तीसंबंधी सर्वसाधारण नियम :

- कॉलेजने निश्चित केलेला ड्रेस कोड सर्व विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.
- वर्गात, ग्रंथालयात व कॉलेजच्या आवारात शिस्त व शांतता पाळावी.
- हजेरी नियमित असावी. किमान हजेरी ८०% आवश्यक आहे. कॉलेजच्या पूर्व परवानगीशिवाय सातत्याने गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव हजेरी पटातून कमी करण्यात येते.
- ज्या वेळी तास नसेल त्यावेळी ग्रंथालय, वाचनालय, खेळाची ठिकाणे इ. ठिकाणी विद्यार्थ्यांनी असावे, तास चालू असताना व्हरांड्यात किंवा मैदानात गट करून गप्पा मारणे या गोष्टी करू नयेत.
- घटक चाचणी, स्वाध्याय, सत्रपरीक्षा १ व २, सहामाही, सराव व जादा सराव इ. परीक्षांना हजर राहणे सक्तीचे आहे.
- रयत शिक्षण संस्थेच्या आदेशानुसार या कॉलेजमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन (Gathering) होणार नाही. तसेच या कॉलेजमध्ये कोणताही पारंपारिक दिवस (Traditional Day) साजरा होणार नाही याची नोंद घ्यावी.
- कॉलेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्र (आयडेंटीटी कार्ड) घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने ओळखपत्र नेहमी जवळ बाळगावे, कॉलेज व बोर्डाच्या परीक्षांच्यावेळी ओळखपत्र जवळ असणे आवश्यक आहे.
- कॉलेजची इमारत, फर्निचर, ग्रंथ, प्रयोग साहित्य इ. ची मोडतोड करणे, त्यावर मजकूर लिहिणे या गोष्टी अक्षम्य गुन्हा समजल्या जातील.
- दुचाकी व इतर वाहने नेमून दिलेल्या जागीच ठेवावीत.
- हरवलेल्या व सापडलेल्या वस्तूसंबंधी कॉलेज – कार्यालयामध्ये माहिती द्यावी.
- शिस्तीसंबंधीचा प्राचार्यांचा निर्णय अखेरचा राहील.
- शासन व बोर्ड नियमानुसार विद्यार्थ्यांची वार्षिक हजेरी ८०% पेक्षा कमी असेल तर त्यास बोर्डाच्या परीक्षेस बसता येणार नाही. तसेच त्यास कोणतीही आर्थिक सवलत मिळणार नाही.
- वरील नियम व शिस्तीसंबंधी वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सुचनांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. अन्यथा कडक कारवाई केली जाईल.
- **विद्यार्थ्यांना वर्गामध्ये मोबाईल फोन वापरण्यास बंदी आहे.**



कर्मवीर जयंती सन २०२४-२५



CA / CS फौंडेशन पात्र विद्यार्थी



NDA प्रथम बॅच



राष्ट्रीय विज्ञान गणित दिन



ISRO यात्रा भेट



वैद्यकीय प्रवेश पात्र विद्यार्थी



शताब्दी इमारत




मुलींचे वसतिगृह




नविन मुलांचे वसतिगृह



केशवराव पवार मध्यवर्ती ग्रंथालय



मल्टी एक्सरसाईज जिमन्यॉशियम

*Shree Sainath Press, Karad*